# सेवाक्षेत्र

**Thore Shivaji Dattatraya**

Ph. D,M. Phil.M.Com, M.A. (Eco), M.A.(Pol), M.A. (Mar), G.D.C & A, B.Ed (Gen), B.Ed (Phy), Arts, Science & Commerce College, Manmad, Dits. Nasik(M.S.), Research guide Pune, Univercity(Bus.Adm. & Business Practices)

## प्रस्तावना [Introduction]

जागतिकदृष्ट्या सेवाक्षेत्र हे जास्त उत्पादन व रोजगार मिळवून देणारे क्षेत्र आहे. सेवाक्षेत्राच्या वाढीमुळे बाजाराचा विस्तार होतो, रोजगार वाढतो, मागणी वाढते, श्रमविभागणी होते. भारतीय आर्थिक विकासाच्या दृष्टीने सेवाक्षेत्र हा महत्वाचा दुवा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने स्वातंत्र्यानंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. भारत हा विकसनशील देश असून शेती हा मुख्य व्यवसाय आहे. ग्रामीण भागाचा विकास घडविल्याशिवाय भारताचे आर्थिक विकासाचे स्वप्न पुर्ण होणार नाही. भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार रोजगार एपलब्ध होणे गरजेचे आहे. देशात आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण झाले आहे. म्हणून भारत हा वेसनशील देश असून येथे बेरोजगारीच्या प्रश्नांवर उपाययोजना करणे देशातील जनतेच्या दृष्टीने सकारात्मक आहे.

जागतिकीकरणाचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्रात सेवाक्षेत्राचा समावेश होतो. सेवाक्षेत्रात प्रामुख्याने व्यापार, वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा अशा अदृश्य सेवांचा सामावेश होतो. ग्राहकांच्या गरजेप्रमाणे जलद व कमीत कमी किमतीला वस्तू पुरवठा करणे हे सेवाक्षेत्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. उत्पादकता, टिकाऊपणा, उपयुक्तता आणि संभाव्यता यात सुधारणा करण्यासाठी माणसाने आपल्या वेळेचा व ज्ञानाचा उपयोग करून सेवा क्षेत्राचा विस्तार केला.

भारतीय अर्थव्यवस्था तीन क्षेत्रांमध्ये विभागली आहे. प्राथमिक क्षेत्र यामध्ये कृषी, पशुपालन, मासेमारी इ. चा समावेश होतो. द्वितीय क्षेत्र यामध्ये उत्पादन प्रक्रिया, बांधकाम यांचा समावेश होतो. आणि तृतीय क्षेत्रात अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या अदृश्य स्वरूपातील सेवांचा समावेश होतो. यामुळेच याला 'सेवाक्षेत्र' असे संबोधले जाते.

उद्योग या बरोबरीने अर्थव्यवस्थेतील महत्वाचा घटक म्हणजे 'सेवाक्षेत्र'. जसजसे औद्योगिकीकरण वाढत गेले, तसतसे दुय्यम आणि पूरक व्यवसाय वाढत गेले. जसे शेती व उद्योग हे पूरक आहेत. म्हणजेच उद्योगाशिवाय वस्तू तयार होत नाहीत, तसेच सेवाक्षेत्र हे सुद्धा शेती व उद्योग क्षेत्रात महत्वाचा घटक आहे. सेवाक्षेत्रामुळे सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार

निर्माण झाला आहे. तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात सर्वत्र होत आहे. यातून उत्पन्नातही भर पडत आहे. वाहतूक, दळण-वळण, माहिती तंत्रज्ञान यातही मोठ्या प्रमाणात भर पडत आहे.

**1. उद्देश**

1) सेवाक्षेत्र अर्थाचा अभ्यास करणे.
2) सेवा क्षेत्र व्याख्येचा अभ्यास करणे.
3) सेवा क्षेत्राच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
4) सेवा क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील भूमिकेचा अभ्यास करणे.

**2. गृहितके**

1) सेवाक्षेत्र अर्थाचा अभ्यास करीत आहे.
2) सेवा क्षेत्र व्याख्येचा अभ्यास करीत आहे.
3) सेवा क्षेत्राच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करीत आहे.
4) सेवा क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील भूमिकेचा अभ्यास करीत आहे.

**3. सेवा क्षेत्र अर्थ [Meaning of Service Sector]**

भारतीय अर्थव्यवस्थेतील तृतीय क्षेत्रात सेवाक्षेत्राचा समावेश होतो. सेवाक्षेत्रात प्रामुख्याने व्यापार, वाहतूक, दळणवळण, वित्तपुरवठा अशा अदृश्य सेवांचा समावेश होतो. सेवाक्षेत्राचे उद्दिष्ट म्हणजे ग्राहकांच्या गरजेप्रमाणे जलद व कमीत कमी किमतीला वस्तू पुरवठा करणे.

उत्पादन क्षमता, टिकाऊपणा, उपयुक्तता आणि संभाव्यता यात सुधारणा करण्यासाठी माणसाने आपल्या वेळेचा व ज्ञानाचा उपयोग करून सेवाक्षेत्राचा विस्तार केला. आंतरराष्ट्रीय मानक युनायटेड नेशन्स नुसार या उपक्रमामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

1) घाऊक व किरकोळ व्यापार, मोटार, वाहने, मोटारसायकली, वैयक्तिक आणि घरगुती वस्तूंची दुरूस्ती.
2) हॉटेल आणि रेस्टॉरंट्स
3) वाहतूक, संचय आणि संप्रेषण
4) आर्थिक मध्यस्थी
5) भू-संपत्ती भाड्याने देणे आणि व्यवसाय घडामोडी
6) सार्वजनिक प्रशासन आणि संरक्षण, सक्तीची सामाजिक सुरक्षा
7) शिक्षण
8) आरोग्य आणि सामाजिक कार्य
9) अन्य समुदाय, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा घडामोडी

### ८ सेवा क्षेत्रातील अर्थव्यवस्थेतील स्थान

| | |
|---|---|
| प्राथमिक क्षेत्र | शेती, मत्स्य, नैसर्गिक साधने, जंगले |
| द्वितीय क्षेत्र | खनिज उत्पादन, वीज, गॅस, पाणीपुरवठा, कारखानदारी |
| तृतीयक क्षेत्र (सेवाक्षेत्र) | व्यापार, वाहतूक, दळणवळण, बँक, वित्त व्यवहार, आरोग्य, विमा, इ. |

सेवा हा व्यक्तीचा अंतर्गत गुण असून यामध्ये शारिरीक व बौद्धिक श्रमांचा समावेश होतो. नागरिकांच्या हितासाठी सरकार मार्फत सुविधा निर्माण केलेल्या आहे त्या म्हणजे सेवा होय. सेवा म्हणजे मदत करणे, साहाय्यता करणे, शुश्रूशा करणे. सेवा ही अशी क्रिया आहे ज्याचा लाभ आपण एकाकडून दुसऱ्याला देतो पण वस्तूप्रमाणे मालकी हक्क निर्माण होत नाही.

### 4. व्याख्या

**1) व्याख्या : सेवा [Definition of Service]**

"लोकांच्या गरजा भागविणारी पद्धती किंवा संस्था, एखादी संस्था करीत असलेले काम, सेवा, सेवाकार्य, व्यवस्था."

"Method or organization that cater to the needs of people, the work, service, service work or arrangement."

"सेवा म्हणजे अशी क्रिया जिचा लाभ एकाद्वारे दुसऱ्याला देतांना वस्तूप्रमाणे मालकी हक्क निर्माण होत नाही तर गरजांची पुर्तता होते." (कोस्टर व आर्मस्ट्रॉंग)

"Service is such activity which transfer benefit from one person to another to satisfy need without transferring ownership."

**ब) व्याख्या : सेवाक्षेत्र [Definition of Service Sector]**

"सेवाक्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा भाग असून त्या विविध प्रकारच्या वैयक्तिक आणि व्यवसाय सेवांच्या तरतुदींशी संबंधित आहेत." (आर्थिक व्याख्या)

"Service Sector is that part of the economy concerned with the provision of a wide variety of personal & business services."
[By – Financial Definition]

वरील व्याख्येवरून असे निदर्शनास येते की, सेवा म्हणजे –

- मदत करणे
- सहाय्यता करणे
- शुश्रूषा करणे

स्पर्धेच्या युगात सेवाक्षेत्र आर्थिक विकासात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. परिवहन, बँकींग, दळणवळण, साठवण इ. बाबी सेवाक्षेत्रामध्ये मोडतात. या क्षेत्रामार्फत वैयक्तिक व व्यावसायिक सेवा पुरविल्या जातात. सेवाक्षेत्रामध्ये – डॉक्टर, शिक्षक, वकील इ. चा ही समावेश होतो. ह्या व्यक्ती देशाच्या विकासाच्या दृष्टीने उत्तम सेवा देत असतात.

### 5. सेवा क्षेत्राची वैशिष्ट्ये




सेवा या अस्पर्शनीय असून त्यांना इतर वस्तूंप्रमाणे आकार, गंध, वजन नसते. सेवा या गुणात्मक त्या भासमान असतात. अस्पर्शनीयता हे सेवांच्या प्रकारानुसार ठरते. हॉटेल, प्रवास यात स्पर्शनीयता जाणवते. सेवा माजपट्टीने मोजता येत नाही, उदा. वकीलानी दिलेला सल्ला, शिक्षकाने दिलेले शिक्षण व ज्ञान यांचे मोजमाप करणे कठीण कठीण असते. एकाच सेवांचे उपभोक्ते अनेक असू शकतात, उदा. करमणूक सेवा, रेल्वे, बस, विमानसेवा, ज्ञानार्जन इ.

कोणत्याही सेवेचा उपभोग घेऊन वापर करता येतो. परंतु त्याची मालकी हस्तांतरीत होत नाही, उदा. वैद्यकीय सेवा, प्रवास सेवा, करमणूक सेवा इ. सेवा देणारा आणि सेवा हे अविभाज्य घटक असून ते एकमेकांपासून वेगळे करणे अशक्य आहे, उदा. डॉक्टर व त्यांचे ज्ञान, शिक्षक व त्यांचे ज्ञान. सेवांचे स्वरूप ग्राहकानुसार बदलते. सेवांचा साठा करता येत नाही. सेवा क्षेत्रामध्ये ग्राहकांची व्यक्तिगत हजेरी असावी लागते. सेवा अदृश्य व अस्पर्शनीय आहे. सेवा उद्योग

अर्थव्यवस्थेत महत्वाची आहे. कारण यापासून रोजगार निर्मिती होऊन बेकारी दूर होण्यास मदत होते. स्पर्धेच्या युगात सेवा क्षेत्राला चांगलाच प्रतिसाद जनतेकडून मिळत आहे.

## 6. सेवा क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील भूमिका / महत्व




जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतसेवाक्षेत्रामुळे आर्थिक विकासाचे चित्रच बदलले आहे. कोणत्याही देशाचा विकास हा शेती, औद्योगिक क्षेत्र त्याचबरोबर सेवाक्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. १९५० – ५१ मध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा भारतीय अर्थव्यवस्थेत २७.५ टक्के होता. तो २००५-२००६ मध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त होता. या क्षेत्रात सर्वात अधिक टक्केवारी व्यापार हॉटेल, वाहतूक व दळणवळण या क्षेत्रांची आहे. त्यानंतर वित्त, विमा व इतर व्यावसायिकांचा समावेश होतो.

स्पर्धेच्या युगात सेवाक्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक प्रभावी क्षेत्र आहे. राष्ट्रीय उत्पन्नात या क्षेत्राचा हातभार जास्त प्रमाणात आहे. २०१० च्या GDP मध्ये भारतात ५५.३ टक्के वाटा सेवाक्षेत्राचा आहे. यातून रोजगार निर्मिती होऊन कुटुंबाचे उत्पन्न वाढते. व बेकारी कमी होण्यास मदत होते.

वित्तीय संस्थांच्या वाढत्या प्रभावामुळे भारतीय कारखान्यांमध्ये आधुनिकीकरण होण्यास साहाय्य झाले. आधुनिकता वाढली आणि उत्पादन खर्चात कपात झाली. खाजगी वाहतूक कंपन्यांनी भारतात व इतर देशांमध्ये सहली आयोजित करण्याची परवरनगी मिळवली. त्याचप्रमाणे परदेशी पर्यटन कंपन्यांबरोबर सहलीचे नियोजन केले. यामुळे पर्यटन क्षेत्रांचा विस्तार होऊन त्यातून रोजगार निर्माण झाला. या व्यवसायातून २००४ मध्ये २,१२८ कोटी रूपयाचे परकीय चलन मिळाले, तसेच २०१८ साली या व्यवसायातून १६.९१ लाख कोटी परकीय चलन मिळाले. भारताच्या एकूण रोजगारापैकी ८.१ टक्के लोक हे पर्यटनक्षेत्राशी निगडीत आहेत.

देशाच्या आर्थिक प्रगतीत सेवाक्षेत्राचा मोठा हातभार आहे. व्यापार, हॉटेल, दळणवळण, वाहतूक इ. क्षेत्रातून रोजगार निर्मिती दैनंदिन वाढत आहे. ज्या व्यक्ती किंवा संस्था सेवा देतात, त्यांना GST[Goods & Service Tax] जमा करावा लागतो. शासनाला सेवाकर [Service Tax] अंतर्गत कर उत्पन्नन मिळवून देण्यात सेवाक्षेत्राचा मोठा वाटा आहे.

स्पर्धेच्या आजच्या परिस्थितीत साक्षर आणि निरक्षर तरूण हे स्वतंत्र व्यवसाय सुरू करू शकतात व त्यामुळे परावलंबित्व कमी होण्यास मदत किंवा सहाय्य होते. व्यक्तीने प्राप्त केलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करून तो स्वावलंबनावर व्यापार व्यवसाय व उद्योग करून आपले आनंदी, सुखी जीवन जगू शकतो. तसेच जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीत बरे वाईट गुण असतात, तो आपल्या गुणाच्या उपयोग करून स्वत:चे चरितार्थ भागवू शकतो. उदा. नेतृत्वगुण, धाडसी वृत्ती इ. सेवा क्षेत्रातून रोजगार निर्माण होत असल्याने त्यांचे दिवसादिवस वाढत आहे. हे एक नाविण्य आहे.

## 7. समारोप

भारतात सेवाक्षेत्राचा विस्तार झपाट्याने होत आहे. बँकिंग, दळणवळण, संप्रेषण या सेवांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. सेवा क्षोत्राचे सर्वात हत्वाचे उद्दिष्ट जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पाहोचविणे व त्यांना पुर्ण समाधान मिळणे हेच आहे. या क्षेत्रात संख्यात्मक व गुणात्मक बदल होणे गरजेचे / निकडीचे आहे. या क्षेत्रामुळे आर्थिक प्रगतीचा दर मोठ्या प्रमाणात उंचावू शकतो. हे सेवा क्षेत्र प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात साधनाचा उपयोग योग्य करत आहे. तसेच उत्पादन खर्च कमी करण्यावर लक्ष केंद्रीत करत आहे. सेवा क्षेत्र जागतिक बाजारात पाय रोवून उभे आहे. प्रगतशील व प्रगत देश तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत. यामुळे रोजगार निर्मिती होत आहे. सेवेतील यश हे सेवेच्या स्वरूपावर अवलंबून असते. यश हे सहजासहजी मिळविता येत नाही. यश संपादन करण्यासाठी कार्यक्षमता, तत्परता, ज्ञानाधिष्ठीत, किफायतीदार, सातत्यता असावी लागते. भारतात सेवा क्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. कारण यातून व्यक्ती स्वावलंबी जीवन जगू शकते. याकारण या क्षेत्रातून रोजगार निर्मिती होते. त्यामुळे व्यक्तीच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होते. व्यक्तीला आर्थिक लाभ होतो. त्यातून ती तिच्या दैनंदीन गरजा भागवून भविष्यकाळासाठी बचतही करू शकते. अप्रत्यक्षरित्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातवाढ होते. यातून देशात समता, एकता आणि शांतता नांदते. यामुळे सेवाक्षेत्राचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे.

## 8. संदर्भग्रंथ

1) व्यावसायिक उद्योजकता डॉ. ज्ञानदेव लक्ष्मण निटवे, डॉ. रूपाली बिपीन शेठ
निराली प्रकाशन, पुणे – ४११ ००२